# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www.mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय**


जा. क्र. मिभा / मनपा / उपआ(प)/ ९२/2023-२४ दिनांक: १४/06/2023

## // कार्यादेश //

प्रति,
मे. हाय टेक सर्विसेस
गट क्र. १५३६, प्लॉट नंबर.५
निगडी तळवडे रोड, ज्योतिबानगर जवळ,
चिखली पुणे – ४११०६२.

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पर्यावरण विषयक जनजागृती करणेकरिता IEC इलेक्ट्रिक वाहन पुरवठा करणेबाबत.**

**संदर्भ : १. मा. आयुक्त यांची दि. १२/०५/२०२३ रोजीची मंजुरी.**
**२. प्रशासकीय ठराव क्र. ६५, दि. १८/०५/२०२३ रोजीची मान्यता.**
**३. दि. १३/०६/२०२३ रोजीचा करारनामा.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पर्यावरण विषयक जनजागृती करणेकरिता IEC इलेक्ट्रिक वाहन – ०१ नग खरेदी करणेकामी मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी प्रशासकीय ठराव क्र. ६५, दि. १८/०५/२०२३ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्याअन्वये मंजूर दराप्रमाणे आपणांस कार्यादेश देण्यात येत आहे.

| Sr. No. | Description of Work | Quantity & Unit | Amount of Work |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | GVW up to 3 Ton, Electric Operated BS-VI Chassis | 01 Nos. | **Rs.98,00,000.00** (including all taxes) |
| 2 | Design, Fabrication & Supply of IEC vehicle as per the technical specification given in the tender documents | 01 Nos. | |
| 3 | Annual Maintenance of IEC vehicle as per tender specifications and requirements.(After Completion of 12 Months Warranty Period) | 05 Years | |

तरी करारनाम्यातील व निविदेतील सर्व अटीशर्ती अधिन राहून विहित मुदतीत पर्यावरण विषयक जनजागृती करणेकरिता IEC इलेक्ट्रिक वाहन – ०१ नग चा पुरवठा करण्यात यावा.

14/6

(संजय शिंदे)
उपायुक्त (पर्यावरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

HI-TECH SERVICES

“आपली जबाबदारी व अधिकार, मजबूत लोकशाहीचा आधार”
“जागरुक मतदार लोकशाहीचा आधार”

शाखा प्रबंधक / Branch Manager

ACE Scanner

# // करारनामा //

करारनामा लिहून घेणार :- उपायुक्त (पर्यावरण)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

करारनामा लिहून देणार :- मे. हाय टेक सर्विसेस
गट क्र. १५३६, प्लॉट नंबर. ५ निगडी तळवडे रोड,
ज्योतिबानगर जवळ, चिखली पुणे – ४११०६२.

कारणे करारनामा लिहून देण्यात येतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकरिता IEC इलेक्ट्रिक वाहन खरेदी करणेकामी दि. २१/०३/२०२३ रोजी जाहीर निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यास अनुसरून सदर कामी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निविदापत्रकाप्रमाणे निविदाधारक यांनी महानगरपालिकेस दर सादर केले आहेत. सदर निविदेस (दरास) मा. प्रशासकीय ठराव क्र. ६५, दि. १८/०५/२०२३ अन्वये मंजुरी दिलेली आहे. महानगरपालिका व निविदाधारक या दोन्हींमधील अटीशर्ती खालीलप्रमाणे.

खालील तक्त्यात नमूद केलेल्या दरानुसार पर्यावरण विभागाकरिता वरील नमूद वाहन बॉडी बिल्डिंग करून पुरवठा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. याकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. ६५, दि. १८/०५/२०२३ अन्वये सदरचे दर (सर्व करांसह) मंजूर करण्यात आलेले आहेत.

| Sr. No. | Description of Work | Quantity & Unit | Description of Work |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | GVW up to 3 Ton, Electric Operated BS – VI Chassis | 01 No. | **Rs.98,00,000.00/- (inclusive of all taxes)** |
| 2 | Design, fabrication & supply of IEC vehicle as per the technical specification given in the tender documents | 01 No. | |
| 3 | Annual Maintenance of IEC vehicle as per tender specifications and requirements. | 05Years | |

अटीशर्ती:

१. वरील प्रमाणे दर सर्व करांसहित आहेत.

२. निविदाधारकास देण्यात आलेल्या चेसिसच्या दिनांकापासून ०६ महिन्यात मिरा भाईंदर महानगरपालिका पर्यावरण विभागाकरिता वर नमूद केलेले वाहन पुरवठा करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३. मुदतीत सदर काम झाले नाही तर त्यापुढील विलंबाच्या प्रत्येक आठवड्याकरिता ०.५% किंवा कमाल १०% पर्यंत विलंब शुल्क आकारणेचा अधिकार मा. आयुक्त सो. यांचा राहील.

४. दंड आकारण्याचे महिन्यानंतरही पुरवठा करणेचे काम पूर्ण झाले नाही तर त्यामुळे महानगरपालिकेस होणाऱ्या नुकसानास निविदाधारक जबाबदार राहतील व निविदाधारकांचा सदर ठेका रद्द करून त्याची सुरक्षा व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

५. चेसिस खरेदी करीत अदा करावयाची किंमत हि उत्पादक/अधिकृत विक्रेता यांच्याकडून Proforma Invoice घेऊन त्यांना आगाऊ अदा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची राहील व सदर अदा केलेली रक्कम एकूण मंजूर दरातून कपात करून उर्वरित देयक निविदाधारकास अदा करण्यात येईल.

ACE Scanner

६. निविदा पत्रकात (Tender document ) नमूद केल्यानुसार वाहनाच्या बॉडी बिल्डिंगचे कामाचे नमूद टप्प्यानुसार तपासणी करणेकरीता अधिकारी किंवा महापालिकेचे प्रतिनिधी याना कंपनीमार्फत निमंत्रित करण्यात येईल.

७. वाहनाचे बॉडी बिल्डिंग काम पूर्ण झालेनंतर वाहने महापालिकेस पोहच करणे व त्याची आर. टी. ओ. नोंदणी करणे ही जबाबदारी निविदाधारकाची राहील. सदर कामी वाहनांचा विमा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

८. निविदा पत्रकातील अटीनुसार निविदाधारकाने ५% इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून जमा करावयाची आहे. त्यापैकी निविदा बयाणा रक्कम (EMD) म्हणून अदा केलेली १%रक्कम राखून ठेवण्यात येणार असून, २% रक्कम बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारण्यात येईल, व उर्वरित २% रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.

९. मिरा भाईंदर महानगरपालिका पर्यावरण विभागाकरिता IEC इलेक्ट्रिक वाहन पुरवठा मुदतीत करण्यास निविदाधारकाने हयगय, कसूर किंवा निष्काळजीपणा केल्यास महानगरपालिकेस सदर कामी पुन्हा जो खटाटोप करावा लागेल, विलंबामुळे जी गैरसोय सहन करावी लागेल किंवा भाववाढीमुळे जे नुकसान होईल त्या सर्वांची भरपाई ठेकेदाराच्या निविदा बयाणा, सुरक्षा अनामत रक्कमेमधून किंवा खाजगी मालमत्तेमधून वसूल करण्यात येईल.

१०. मिरा भाईंदर मनगरपालिकेच्या पर्यावरण विभागास IEC इलेक्ट्रिक वाहन पुरवठा केले नंतर गॅरंटी/वॉरंटी च्या मुदतीत साहित्याची गुणवत्ता, दर्जा, परिमाण याबाबत काही तक्रार असल्यास त्याबाबत महानगरपालिकेने लेखी तक्रार, निविदाधारकाकडे देणेची आहे अशी तक्रार असल्यास १५ दिवसांत तक्रार दूर करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. सदर तक्रारींचे निवारण मुदतीत न केल्यास व करारनाम्यातील अटीशर्तींचे उल्लंघन केल्यास महानगरपालिकेने २४ तासांची नोटीस दिल्यानंतर सदर करारनामा रद्द करण्यात येईल व महानगरपालिकेस होणारे सर्व नुकसान व त्याचे भरपाईस ठेकेदार जबाबदार राहील.

११. सदर कामी ठेकेदाराने भरलेले निविदा बयाणा/ सुरक्षा अनामत रक्कम गॅरंटी/वॉरंटी कालावधी संपल्यानंतर निविदाधारकाने लेखी अर्ज केल्यानंतर महानगरपालिकेने ठेकेदारास परत करावयाची आहे. दरम्यान पुरविलेल्या साहित्यासंबधी काही वाद उद्भवल्यास ही रक्कम अडवून ठेवण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे.

१२. सदर कामाची संपूर्ण पूर्तता हि निविदा पत्रक मधील नमूद अटीशर्तीनुसार करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.त्यात हयगय झाल्यास त्यामुळे महानगरपालिकेस होणारे नुकसान व त्याचे भरपाईस निविदाधारक जबाबदार राहील.

१३. सदर वाहनांची बांधणी व संबंधित साहित्य हे निविदा पत्रक मध्ये नमूद केलेल्या तांत्रिक तपशिलानुसार (Technical स्पेसिफिकेशन) पुरवण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. ह्यात हयगय झाल्यास त्यामुळे महानगरपालिकेस होणारे सर्व नुकसान व त्याचे भरपाईस निविदाधारक जबाबदार राहील.

१४. शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार सर्व शासकीय कपात व इतर कपात निविदाधारकाच्या देयकातून कपात करण्यात येईल.

१५. सदर कामाबाबत कार्यादेश रद्द करणेबाबत किंवा इतर कोणताही वाद निर्माण झाल्यास सदर वादाचा लवाद कार्यवाहीनुसार निवाडा करण्यात येईल.

१६. कामापोटी अथवा मटेरियलकरीता महानगरपालिकेकडून निविदाधारकास कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम/आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१७. निविदा बयाणा व सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब शुल्काची मागणी निविदाधारकामार्फत केली जाणार नाही.

मे. हायटेक सर्विसेस पुणे याद्वारे लेखी मान्य व कबुल करतो की, वरील सर्व मजकूर मी वाचलेला असून त्यातील अटी व शर्ती मला कराराचा कालावधी काम संपेपर्यंत बंधनकारक आहेत. त्यादखल मी या करारनाम्यावर राजीखुशीने व कोणतेही दडपण नसताना आज दि. १३/०६/२०२३ रोजी चांगल्या मनस्थितीत स्वाक्षरी करीत आहे.

करारनामा लिहून घेणार

संजय शिंदे
उपायुक्त (पर्यावरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

करारनामा लिहून देणार

मे. हाय टेक सर्विसेस
गट क्र. १५३६, प्लॉट नंबर.५
निगडी तळवडे रोड, ज्योतिबानगर जवळ,
चिखली पुणे - ४११०६२

HI-TECH SERVICES PUNE

१. मारुती गायकवाड
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

२. अनिकेत मानोरकर
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

सन 2023/2024 करारनामा नोंदवही
अनुं. क्र ५४१ दि. १४/ ६ /23 अन्वये
नोंद करणेत आली

महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

ACE Scanner